**FOR IMMEDIATE RELEASE**

# The World Bank

**Contacts:** *In Delhi*
Sumir Lal (91 11) 2461-7241
slal@worldbank.org
*In Washington*
Dale Lautenbach (202) 473-3405
dlautenbach@worldbank.org

## विश्व बॅंकेने प्रमुख भारतीय शहरी वाहतूक पुढाकार कार्यक्रमास दिली जाणारी मदत स्थगित केली

नवी दिल्ली–गुरूवार, मार्च 2ए 2006–विश्व बॅंकेने मुंबई शहरी वाहतूक प्रकल्पाच्या रस्ते व पुनर्वसन घटकांना दिली जाणारी आर्थिक मदत जो पर्यंत या कार्यांमुळे प्रभावित झालेल्या लोकांना न्यायपूर्ण वागणूक मिळण्याबाबतच्या विषयांसंबंधी समस्या सोडविल्या जात नाहीत तोपर्यंत आंशिक स्वरूपात स्थगित केली आहे.

एमयूटीपी ही रस्ता व रेल्वे नवीनीकरण योजना आहे ज्यांत 17000 घरगुती व किमान 2500 दुकाने व लघु व्यावसायिक युनिटस्च्या निर्हेतुक पुनर्वसनाचा समावेश आहे. किमान 14000 कुटुंबांना या पूर्वीच सुरक्षित जागी हलविण्यात आले आहे. हे लोक शहरांतील अत्यधिक निर्धन, बहुतेक रेल्वे रूळांच्या शेजारी घाणेरड्या व धोक्याच्या परिस्थितीत राहणारे आहेत.

आता त्यांना उंच इमारतींत स्थापिले गेले आहे, जेथे त्यांना भाडेपटट्याच्या बाबतीत सुरक्षा दिली गेली आहे व त्यांच्यांतील बरेचसे लोक त्यांच्या सुधारलेल्या परिवेशात संतुष्ट असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले आहे. ह्याच्या जोडीला रेलवे प्रणालीच्या दक्षतेमध्ये सुधार घडून आला आहे ज्यामुळे मुंबईच्या लक्षावधि प्रवाश्यांची सोय चांगली झाली आहे.

यद्यपि, या क्लिष्ट प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या विविध पैलूंमध्ये अडचणी आल्या आहेत, हे सर्व 13 लक्ष लोक असलेल्या शहरांत, जगातील सर्वात जास्त गर्दी असलेल्या मेट्रोपोलिटिन क्षेत्रांत घडून आले. काही लोकांच्या पुनर्वसना नंतर गंभीर समस्या उदित झाल्या आहेत ज्यांमध्ये बॅंक व महाराष्ट्र राज्य सरकार यांच्यातील करारानुसार समाधान शोधले गेलेले नाही.

यातील बरेच लोक पुनर्वसना नंतरच्या समस्यांना तोंड देत आहेत जसे, पाण्याच्या पुरवठ्या बाबतच्या सेवा व केराचा निचरा, काही लोकांसाठी वाढलेला प्रवासाचा काळ आणि इमारतीच्या देखरेखी संबंधीच्या पैशांची तरतूद होण्यास लागणारा विलंब होय इतर गंभीर समस्या काही लोकांच्या पुनर्वसनासंबंधी आहेत साधारणपणे, अशा एका तक्रार प्रणालीचा अभाव आहे जी लोकांच्या पुनर्वसनाला मदत करेल.

"मदत स्थगित करणे ही एक गंभीर कृति आहे, या समस्यांच्या यशस्वी परिणामा बाबत आपण किती गंभीर आहोत याची प्रतिक्षिप्त क्रिया दर्शविणारी," असे श्री. मायकल कार्टर, विश्व बॅंकेचे भारतातील देश निर्देशक यांनी दिल्ली येथे म्हटले. "महाराष्ट्र सरकारकडे एक उपयुक्त कार्य योजना आहे ज्या योगे सध्याच्या काळातील समस्यांना संबोधित करता येईल व होऊ घातलेले पुनर्वसन आमच्या करारानुसार होत असल्याची खात्री करून घेता येईल. आता कार्यान्वयन ही गुरूकिल्ली आहे. प्रभावित लोकांना समाधानकारक परिणाम मिळवून देण्यासाठी आम्ही सरकारला पाठिंबा देत काम करू एकदा प्रगती सुरू झाली, म्हणजे आम्ही स्थगनाच्या बाबतीत पुनर्विचार करू."

त्यांनी म्हटले की मुद्द्यांच्या संबोधनाबाबत बॅंकेला पूर्ण विश्वास होता. "आम्ही आमच्या नीती व कराराप्रमाणे सर्व काही व्यवस्थित करविण्यासाठी सरकारला मदत करण्यास क्षणाचा ही विलंब करणार नाही, आमच्या कराराशी प्रामाणिक राहून आणि अशा प्रकारे ज्या योगे नागरी कार्ये एका दिवसाचा ही विलंब न होता चालू राहतील, कोणाला ही मागे टाकले जाणार नाही, ना दुकानदार ना घरमालकांना."

"भारतामधील नागरी आव्हान फार प्रचंड आहे," कार्टर म्हणाले. "वर्ष 2025 पर्यंत किमान अर्धा खर्व लोक प्रगतीच्या महत्वपूर्ण संधी आणि गरीबीतील आव्हाने या दोन्ही परिस्थितींसह देशांतील शहरांत

राहात असतील. भारत सरकारने आपल्या राष्ट्रीय शहरी नवीनीकरण लक्ष्यामार्फत हे जाणून घेतले आहे. दुर्दैवाने शहरी विकासाकरीता काही पुनर्वसने टाळता येणार नाहीत आणि प्रभावित लोकांच्या राहण्याच्या स्तरामध्ये आणि संधींमध्ये सुधार आणण्याच्या या प्रणालीत मोठे आव्हान आहे–या कडे विकासाची एक संधी म्हणून पाहतां."

"विश्व बँकेला तिच्या अंतराष्ट्रीय पातळीवर ओळखल्या जात असलेल्या नीतींचा अभिमान वाटतो ज्या योगे या प्रकारच्या प्रभावांशी न्यायपूर्ण व्यवहार ठेवण्यात येतो," असे कार्टर म्हणाले. "क्लिष्ट आणि कठिण? अगदी बरोबर, होय. पण आम्ही सोडून चालू लागणार नाही."

940 अरब यूएस डॉलरच्या एमयूटीपीला या प्रकल्पासाठी रस्ते व रेल्वे घटकांकरीता एका 463 अरब डॉलरच्या आयबीआरडी कर्जाचा पाठिंबा आहे व आयडीए कडून 79 अरब डॉलरचे कर्ज पुनर्वसनासाठी मिळाले आहे. आयडीए तर्फे कर्जाचे वाटप आणि रस्त्याच्या कर्जाच्या (150 अरब यूएस डॉलर) स्थगनाच्या बाबतीतील विषयांच्या समस्या सोडविण्यात खोळंबा आला असल्याचे रेखांकन वर केले गेले आहे.

आयडीए, अंतर्राष्ट्रीय विकास संगठन, हा विश्व बँक ग्रुपचा मदतीचा हात आहे आणि आयबीआरडी हा पुनर्वसन व विकास अंतर्राष्ट्रीय बँक, कमी व्याज असलेली मदतीची खिडकी आहे.

###